
चरित्रकार • पत्रकार -

# डी. जी. तेंडुलकर

१



संपादनः

गुं. फ. आजगांवकर

लेखक

वा. रा. ढवळे

चरित्रकार पत्रकार

# डी. जी. तेंडुलकर

लेखक

**वा. रा. ढवळे**

संपादक :

**गुं. फ. आजगांवकर**

**गौड ब्राह्मण सभा**
३०, के. बी. निवास,
मुंबई ४०० ००४

संपादक व प्रकाशक :

**गुं. फ. आजगांवकर**
२५, के. बी. निवास,
मुंबई ४०० ००४.

**मूल्य रु. २**

आवृत्ती पहिली १९८०
ऑक्टोबर

मुद्रक :

**प्रमोद आर्ट प्रिंटर्स**
१, अमृत इंडस्ट्रीयल इस्टेट,
नवघर रोड, भाईन्दर (पूर्व) ४०१ १०५.


# प्रास्ताविक




ज्यांच्या कार्यामुळे नामरूपाला अर्थ प्राप्त झाला, अशांपैकी डी. जी. ही एक व्यक्ती होती. त्यांचे संपूर्ण नाव दीनानाथ गोपाळ तेंडुलकर. इतिहासप्रसिद्ध कुडाळ प्रांतामधील तेंडुली येथे त्यांचा १९०७ साली जन्म झाला. कै. रा. ब. अनंत शिवाजी देसाई यांच्या मदतीमुळे जे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशांत जाऊन आले त्यांपैकी डी. जी. हे एक होत. महात्माजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचा प्रामाणिक आलेख लिहिण्यासाठीच जणू त्यांचा जन्म झाला असावा! या एकाच कार्यामुळे ते अमर झाले आहेत. गौड ब्राह्मण सभेने त्यांच्या स्मृतिनिमित्त एक व्याख्यान-माला आयोजित केली असून, त्यांचे छोटे चरित्र लिहून घेऊन ते प्रकाशित करण्याची जबाबदारी माझ्यावर सुपूर्द केली होती. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वा. रा. ढवळे यांनी सदर चरित्र लिहिण्याची मी केलेली विनंती मान्य केली व अल्प मुदतीत ते लिहून दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मुंबई मराठी पत्रकार संघ व श्री. अ. ज. अवसरे यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद. लोणावळा येथे 'तेंडुलकर स्मृति–मंदिर' म्हणून एक वास्तू मुंबई मराठी पत्रकार संघाने बांधली आहे. डी. जी. हे एकांतप्रिय व समाजापासून सदा सर्वकाळ अलिप्त राहणारे होते. म्हणूनच त्यांच्या हातून एवढे महान कार्य होऊ शकले. त्यांच्या स्मृतीला माझी श्रद्धांजली.

१५ ऑक्टोबर १९८०

**गुं. फ. आजगांवकर**




डी. जी. आणि पं. नेहरू १९३७ ( प्रदर्शन पहाताना )




पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भेटीदाखल दिलेल्या वस्तू
घड्याळ व सिगरेट केस

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

# चरित्रकार, छायाचित्रकार, पत्रकार :

## महात्मा गांधींचे चरित्रकार : डी. जी. तथा

## दीनानाथ गोपाळ तेंडुलकर,

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

चरित्र-वाङ्मय समृद्ध करणारा 'डी. जी' ऊर्फ डी. जी. तेंडुलकर हा माणूस म्हणजे एक विलक्षण चमत्कार आहे—नव्हे एक अद्‌भुत कथाच होय ! ही चरित्रे त्यांनी इंग्रजी भाषेत लिहिलेली आहेत. प्रामुख्याने महात्मा गांधी यांच्या चरित्राचे पाच ते सहा हजार पृष्ठांचे सचित्र आठ खंड व फ्रंटियर गांधी म्हणून ओळखले जाणारे अब्दुल गफारखान यांचे जवळ जवळ ५५० पृष्ठांचे चरित्र त्यांनी लिहिलेले आहे. फ्रंटियर गांधींचे चरित्र म्हणजे महात्मा गांधींच्या चरित्राचा जणू नववा खंडच म्हणून ओळखले जाते ! ही चरित्रे म्हणजे भारतीय स्वातंत्र्य-युद्ध कालाचा जणू सुसंगत असा इतिहास होय, असेच म्हणणे युक्त होईल. हा इतिहास इंग्रजी भाषेत लिहिणारा हा माणूस 'डी. जी.' या नावाने भारतातच नव्हे तर साऱ्या जगात प्रसिद्ध झाला आहे. विलक्षण बुद्धीचा, विलक्षण चिकाटीचा व विलक्षण ताकदीचा हा माणूस ! या माणसाचे जीवनचरित्र सुद्धा असेच अद्‌भुत-आश्चर्याचा धक्का देणारे आहे.

## तेंडुलकरांचे घराणे

श्री. दीनानाथ गोपाळ तेंडुलकर (डी. जी व दिनू याच नावांनी बहुधा ते सर्वत्र ओळखले जात) यांचा जन्म दि. १५ ऑक्टोबर १९०७ रोजी एका मध्यम वर्गीय कुटुंबात तेंडोली या गावी झाला. त्यावेळी तेंडोली हे गाव सावंतवाडी संस्थानात मोडत असे. स्वातंत्र्योत्तर कालात संस्थाने भारतात विलीन झाली तसे सावंतवाडी संस्थानही विलीन झाले व रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी हा एक तालुका बनला.

तेंडुलकरांचे घराणे हे कुडाळ देशकर गौड ब्राह्मणांचे घराणे. ही जात उत्तरेकडून खाली आली व दक्षिणेत भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपली वसाहत वसविली. त्याला कुडाळदेश असे म्हणत. हा प्रदेश कुडाळ गावाच्या आसपास वसलेला होता. तेंडुलकरांची आई ही कुडाळदेशकर गौड ब्राह्मणातील अवसरे आडनावाच्या कुटुंबातील होती. अवसरे हे मोठे जमीनदार होते व त्यांचा जमीनजुमला वगैरे मालमत्ता मालवण शहरात व जवळपासच्या खेड्यात होती. मालवण जवळील सिंधुदुर्ग किल्ल्याची देखरेख करणाऱ्या मंडळींशी अवसऱ्यांचा संबंध होता. सिंधुदुर्ग म्हणजे समुद्रातला किल्ला. हा किल्ला छत्रपती श्रीशिवाजी महाराजांनी बांधला होता. तो पुढे ब्रिटिशांनी जिंकून घेतला. तेथपर्यंतची व्यवस्था अवसरे कुटुंबीयांकडेच होती.

## तेंडुलकरांच्या आईचे निधन

तेंडुलकरांच्या वडिलांनी—गोपाळरावांनी तेंडोली हे गांव अगदी लहानपणीच सोडले व ते मुंबईत एका दुकानात नोकरीला असलेल्या आपल्या वडील बंधूकडे आले. मराठी सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर गोपाळरावांनी प्राथमिक शिक्षकाची नोकरी स्वेच्छेने पत्करली. ते 'दादा मास्तर' या नावाने ओळखले जात. त्यांचे अनंतराव अवसरे यांच्या विठाबाई या मुलींशी लग्न झाले होते. दादा मास्तरांना तीन मुलगेच होते. त्यापैकी दिनू हा सर्वांत लहान मुलगा. दिनू धोबीतलावाजवळील एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिकत असताना इ. स. १९१९ साली त्याची आई सौ. विठाअक्का वारली. दिनू त्यावेळी

जेमतेम बारा वर्षांचा होता. विठा आक्का प्रकृतीने व शरीराने धडधाकट होती. दिनू रात्री झोपला तेंव्हा तिची प्रकृती चांगली ठणठणीत होती. पण तो दुसऱ्या दिवशी सकाळी उठला तेंव्हा आपली आई मरण पावली. असल्याचे त्याला आढळून आले !

## बी. ए. परीक्षेत पहिला वर्ग

मुंबईत त्यावेळी प्लेगची साथ होतीच, पण इतरही अनेक रोगांच्या साथी फैलावलेल्या होत्या. विठाक्का कॉलेऱ्याच्या साथीला बळी पडली. या आकस्मिक व अनपेक्षित कोसळलेल्या आपत्तीमुळे दिनूला दुःख तसे झालेच पण त्याचा धीर मात्र खचला नाही, त्यामुळे शिक्षण अर्धवट सोडून देण्याची कल्पना त्याला रुचण्यासारखी नव्हती. त्याचे वडील दादा मास्तर हे शिक्षकाच्या नोकरीतून त्याच सुमारास निवृत्त झाले होते. त्यांना जेमतेम रु. ४५ चे निवृत्ति-वेतन मिळत होते. मुंबईसारख्या शहरात त्यावेळी सुद्धा एवढ्या अपुऱ्या निवृत्ति-वेतनात संसाराचा गाडा पेलणे त्यांना कठीण जात होते. तरीसुद्धा दिनूचे शिक्षण पुरे करण्याची जिद्द त्यांनी बाळगली होती. दिनूलाही पुढे शिकायचे होते. म्हणून त्याच्या वडिलांनी एका परिचिताच्या इस्टेटीचे हिशोब लिहिण्याचे काम स्वीकारून तुटपुंज्या निवृत्ति-वेतनाला पूरक होईल एवढे उत्पन्न मिळविण्याची सोय केली हेतू हा की दिनूच्या शिक्षणात खंड पडू नये. दिनू मूळचाच हुषार विद्यार्थी असल्यामुळे, मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याने एलिफन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला व इ. स. १९२८ साली तो बी. ए. च्या परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाला. असें सांगतात की, तो दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाल्याचे प्रथम जाहीर झाले होते. त्याचा विषय गणित होता. पण त्याचे गणिताचे प्राध्यापक पी. एस्. कट्टी यांना तेंडुलकरला दुसरा वर्ग मिळाल्याचे वाचून आश्चर्य वाटले ! म्हणून त्याच्या उत्तरपत्रिका त्यांनी पाहिल्या त्यांना तेव्हां असे आढळून आले की, एका संपूर्ण विभागाचे गुण एकंदर गुणांत जमा करायचे राहिले होते ! ती दुरुस्ती केल्यावर दिनू तेंडुलकर पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले !

## विलायतेला प्रयाण

तेंडुलकरांच्या मनात केंब्रिज येथे जावे व गणित विषयात अधिक प्रावीण्य मिळवून रँग्लर व्हावे असे होते. पण ती गोष्ट सोपी नव्हती. दिनूच्या कॉलेज शिक्षणाचा खर्च करतानाच त्याच्या वडिलांच्या नाकी नऊ आले होते ! निवृत्ति-वेतनाच्या जोडीला दुसऱ्या नोकरीचे पैसे येत असल्यामुळे दिनूचा मॅट्रिकपर्यंतचा व कॉलेजाचा खर्चही गोपाळराव कसाबसा करू शकले. पण विलायतला पाठवायचे म्हणजे दहा-पंधरा हजार रुपयांची व्यवस्था करणे भाग होते. पण दिनूची पुढील शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा व आपल्या मुलाची ती इच्छा पूर्ण करण्याची गोपाळरावांच्या मनाची जबरदस्त ओढ यामुळे पिता-पुत्रांनी शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी फार जोराचे प्रयत्न केले व त्या प्रयत्नांना थोडे फार यशही आले. तेंडुलकर घराण्याच्या एका हितचिंतकांनी आवश्यक तेवढ्या अधिक पैशांची व्यवस्था करण्याचे मोठ्या आनंदाने आश्वासन दिल्यामुळे व प्रत्यक्षात तशी व्यवस्था केल्यामुळे दिनू इ. स. १९२९ साली केंब्रिज विद्यापीठात गणिताचा पदव्युत्तर अभ्यास करण्यासाठी विलायतला रवाना झाला. प्रा. न. र. फाटक यांनी सुद्धा दिनूला अनंत शिवाजी देसाई यांच्याकडे नेले व त्यांनीही तेंडुलकरांना पैशांची मदत केली. केंब्रिज विद्यापीठात तेंडुलकरांच्या वर्गात त्यावेळी श्री. नारळीकर हे होते. नारळीकरांनी आपला केंब्रिज विद्यापीठातील अभ्यासक्रम पुरा करून ते पुढे रँग्लर झाले. जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर हे त्यांचे चिरंजीव होत. तेंडुलकर हे मूळपासून राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे, इ. स. १९३० साली म्हणजे केंब्रिज विद्यापीठात एक वर्षाचा अभ्यास पुरा करतात न करताच तोंच महात्मा गांधींनी भारतात सत्याग्रहाची चळवळ सुरु केली. ती बातमी वाचल्यावर तेंडुलकरांच्या अन्तःकरणातील राष्ट्राभिमान जागा झाला. त्यांचे लक्ष महात्माजींच्या चळवळीकडे लागले. महात्मा गांधींच्या हाकेला 'ओ' देणे हे आपले पहिले कर्तव्य आहे असे त्यांना वाटू लागले. अभ्यासातून लक्ष उडाले ! ते अस्वस्थचित्त झाले ! केंब्रिजला जाऊन एक वर्ष होते न होते

तोंच १९३० साली अभ्यास अर्धवट सोडून ते भारतात परत यायला निघाले. भारतात परत आल्यावर सत्याग्रहाच्या चळवळीत सामील झाले. त्यांनी भूमिगत राहून आघाडीवर असणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना अनेक प्रकारे आतून मदत करण्याचे काम पत्करले. आपले स्नेही यूसफ मेहरअली यांनी सुरू केलेल्या 'वानर सेना' या तरुणांच्या स्वातंत्र्य-संघटनेत तेंडुलकरांनी महत्त्वाची कामगिरी बजावली व मेहेरअली यांना तुरुंगवासाची शिक्षा झाल्यावर 'वानर सेना' चे धुरीणत्व ओघाने त्यांच्याकडेच आले.

ज्या राष्ट्रीय आंदोलनात हिरिरीने भाग घेण्याच्या हेतूने तेंडुलकरांनी केंब्रिज येथील आपला अभ्यास अर्धवट सोडून भारताकडे धाव घेतली, ते आंदोलन—ती सत्याग्रहाची चळवळ हिंसात्मक स्वरूप घेत असलेली पाहून महात्मा गांधींनी इ. स. १९३२ साली अनपेक्षितपणे मागे घेतलं ! त्यामुळे केंब्रिजला परत जाऊन गणितात प्रावीण्य संपादन करण्याची आपली इच्छा पुरी करावी असा निर्णय तेंडुलकरांनी घेतला व ते विलायतेला पुन्हा परत गेले-पण खादीच्या पोषाकात बाह्यत: त्यांचा संपूर्णपणे बदल झालेल्या स्वरूपात ! इंग्लंडात त्यावेळचे वातावरण राष्ट्रीय दृष्टिकोन असलेल्या भारतातील विद्यार्थ्याला तेथे राहण्याच्या दृष्टीने अनुकूल नव्हते—किंबहुना सर्वस्वी प्रतिकूलच होते. त्यामुळे खादीचा पेहराव केलेल्या तेंडुलकरांना तेथे राहणे हे त्रासदायक होऊ लागले. म्हणून गणित विषयात प्रावीण्य मिळविण्याचा आपला हेतू केंब्रिजव्यतिरिक्त अन्य ठिकाणी साध्य करून घेण्यासाठी तेंडुलकरांना केंब्रिज सोडावे लागले. ते जर्मनीला गेले व येथील गॉटिंजन विद्यापीठात त्यांनी प्रवेश मिळविला. त्या विद्यापीठातून इ. स. १९३५ साली गणित विषयात त्यांनी ट्रायपॉस घेतला. पण तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. गणित विषयात अधिक प्रावीण्य संपादन करावे ही त्यांच्या मनाची उत्कट इच्छा होती. त्या दृष्टीने त्यांनी अभ्यास सुरू ठेविला. गणित विषयात डॉक्टरेट मिळविणे हे आपले ध्येय त्यांनी डोळ्यापुढे ठेविले होते. त्यावेळी जर्मनीत नाझींची राजवट सुरु झाली होती. रशियन राजवटीच्या बाजूने बोलणारी मंडळी

व ज्यू लोक यांना सरसकट तुरुंगांत डांबून त्यांचा छळ होऊ लागला होता. ठिकठिकाणी कॉन्सेन्स्ट्रेशन कँप्स उघडण्यांत येऊ लागले होते. गरीब व दलित वर्गातील लोकांबद्दल रशियाला अपार सहानुभूती वाटत असे. त्यामुळे तेंडुलकरांची विचारसरणी कॉम्युनिस्ट धार्जिणी व म्हणून रशियाच्या बाजूला कलणारी अशी होती. याची चाहूल नाझी गेस्टॅपोला म्हणजे नाझी गुप्त पोलीस यंत्रणेला लागल्याशिवाय राहिली नाही. तेंडुलकरांना पकडण्यात येऊन त्यांना तुरुंगांत टाकण्यात आले व त्यांचा अनन्वित छळ होऊं लागला गणितात डॉक्टरेट मिळविण्याचे त्यांचे स्वप्न विरून गेले! त्यांच्या प्राध्यापकांनी मध्यस्ती केल्यामुळे १० दिवसांच्या नाझींच्या तुरुंगातील छळानंतर तुरुंगातून त्यांची सुटका झाली दहा दिवसांच्या अमानुष छळामुळे तेंडुलकर एवढे वैतागून गेले की गणितात डॉक्टरेट घेण्याचा त्यांचा विचार पार विरघळून गेला व त्यांनी रशियाकडे कूच केले. भारतात परत आल्यावर त्यांनी जॉन रीडच्या Ten days that shook the world या पुस्तकाच्या धर्तीवर 'My ten days in Nazi Jail' हे पुस्तक लिहिले. ते Bombay Chronical Magazine' मध्ये प्रथम लेख–रुपाने प्रसिद्ध झाले. पुढे ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. त्याचे मराठी रूपांतरही पुढे प्रसिद्ध झाले.

## रशियातील जीवन

रशियामध्ये गेल्यावर तेंडुलकरांनी आपल्या अभ्यासाचे क्षेत्र बदलले. त्या काळी सिने-फोटोग्राफीच्या क्षेत्रात रशियाने बरीच प्रगती केली होती व त्यासाठी सर्वदूर रशियाची प्रसिद्धी होती. त्या क्षेत्रात तेंडुलकरांनी बरेच प्रावीण्य संपादन केले; इतके की, सिने-औद्योगिक क्षेत्रात 'कॅमेरामन' (छायाचित्रकार) म्हणून त्यांना मोठी नोकरीही मिळू शकली. त्यामुळे अर्थार्जन करुन आपली उपजीविका करणे त्यांना शक्य झाले. पण केवळ स्वत:ची उपजीविका करणे हेंच केवळ तेंडुलकरांच्या जीवनाचे ध्येय नव्हते. 'कॅमेरामन' म्हणून जरी छायाचित्रणाच्या कलेत त्यांनी अद्वितीय

यश संपादन केले असले तरी त्यांच्या लेखणीतून जगाला दिपवून टाकणारी वाङ्मयकृती निर्माण व्हायची होती, हे त्यांचे जीवितकार्य नियतीने अगोदरच आखून ठेविले होते. म्हणूनच रशियात ३० महिने वास्तव्य केल्यानंतर भारताला आपल्या मातृभूमीला परत येण्याची प्रेरणा त्यांच्या मनाला झाली असावी. इ. स. १९३७ साली ते भारतात परत आले. येथे परतल्या-नंतर त्यांनी भारतीय सिनेउद्योग-क्षेत्रात काही काल मोठ्या पगाराची चालून आलेली नोकरी करण्यात घालविला. पण आपल्या स्वभाव-प्रकृतीला ह्या क्षेत्रातील वातावरण रुचणारे नाही, याची चाहूल लागल्यावर क्षणाचाही विलंब न लावता अगर भावी जीवनाचा काहीही विचार न करता त्यांनी त्या नोकरीला रामराम ठोकला !

## पत्रकार म्हणून स्वतंत्र व्यवसाय.

नोकरी सोडल्यानंतर तेंडुलकरांनी इंग्रजी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला. कोणत्याही दैनिकात नोकरी न स्वीकारता पुस्तकपरीक्षणे व स्वतंत्र लेख लिहून त्यांतून मिळणाऱ्या मोबदल्यावर उपजीविका करण्याचे स्वतंत्र जीवन ते जगू लागले. याच कालात त्यांनी 'रशियातील तीस महिने' हे आपले इंग्रजीतून लिहिलेले पुस्तक तयार केले. त्याचे प्रकाशन कर्नाटक छापखान्याचे मालक श्री. मंगेशराव कुलकर्णी यांनी केले. ते पुस्तक इतके लोकप्रिय झाले की, त्या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्या तर निघाल्याच पण प्रादेशिक भाषांतही त्याची भाषांतरे प्रसिद्ध झाली. याच वेळी राष्ट्रीय चळवळीच्या आघाडीवर राहून देशाच्या मुक्तीसाठी लढणाऱ्या आपल्या बांधवांना व मित्रांना यथाशक्ती आर्थिक साहाय्य व इतर प्रकारची मदतही ते करीत असत. त्याचप्रमाणे राष्ट्रीय चळवळीतील एक सैनिक म्हणूनही कामाचा आपला वाटा ते उचलीत असत.

तेंडुलकर हे तीस महिने रशियात होते, साहजिकच त्यांना तेथील कामगारांच्या राजवटीबद्दल व एकंदर कामगार चळवळीबद्दल सहानुभूती

वाटत असे. किंबहुना त्यामुळेच त्यांना 'रशियन डी. जी' म्हणून लोक ओळखीत. ब्रिटनने जर्मनीविरुद्ध जेव्हां युद्ध पुकारले व दुसऱ्या जागतिक महायुद्धाला सुरूवात झाली, त्यावेळी तेंडुलकरांना पकडून गजाच्या आड डांबून ठेवण्यात आले होते. पुढे जेव्हा रशिया हे ब्रिटिशांचे दोस्त राष्ट्र म्हणून युध्दात पडले तेव्हां तेंडुलकरांची तुरुंगातून मुक्तता झाली !

महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्य-युध्द चळवळीचे अंतिम पाऊल इ. स. १९४२ साली 'भारत छोडो' ( Quit India ) असा पुकारा करून टाकले ! नेमक्या त्याच वेळी तेंडुलकरांची तुरुंगातून सुटका झालेली होती. भारतातले एकूण एक मोठे पुढारी पकडून सरकारने त्यांना तुरुंगात डांबून ठेविले, तो दुसऱ्या जागतिक युध्दाचा काळ होता व जे अजून तुरुंगाच्या बाहेर होते त्यांना भूमिगत होऊन स्वातंत्र्य–युध्द चळवळींची पेटविलेली मशाल पेटती ठेवणे भाग होते. तेंडुलकरांना हे राष्ट्रीय आंदोलन चालू ठेवणे ही आपली एक जबाबदारी आहे असे वाटल्यामुळे ती पार पाडण्यासाठी बाहेरून त्यांनी अतोनात कष्ट केले. ४०७ काळबादेवी रोडवरील आपल्या राहत्या खोलीत त्यांनी अनेक भूमिगत पुढाऱ्यांना आश्रय दिला. अशा भूमिगत कार्यकर्त्यांची लपून राहाण्याची एक जागा हे महत्त्व त्या खोलीला आले.

## महात्माजींच्या गौरव-ग्रंथाचे संपादन

इ. स. १९४४–४५ साली जागतिक युद्ध समाप्त झाले व तुरुंगात डांबून ठेविलेल्या मोठमोठ्या राष्ट्रीय पुढाऱ्यांची तुरुंगातून सुटका झाली. ज्या महात्मा गांधींच्या प्रेरणेने भारतीय स्वातंत्र्य युद्धाच्या चळवळीला गती प्राप्त झाली त्या महात्मा गांधींचा एक गौरव-ग्रंथ प्रसिध्द करण्याची कल्पना निघाली. तेंडुलकरांनी या गौरव ग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली होती. (१९४४) नॅशनल हेरल्डचे संपादक श्री. चलपती राव, श्री. विठ्ठल झवेरी व कु. मृणालिनी साराभाई यांनी तेंडुलकरांना संपादनात साहाय्य करण्याचे मान्य केले.

जागतिक कीर्तीच्या महात्मा गांधीं सारख्या पुढाऱ्याचा ' गौरव-ग्रंथ ' संपादन करणे ही गोष्ट सोपी नव्हती. पण आपल्याकडे चालून आलेल्या या कामामुळे एका नवीन क्षेत्रांत आपले कतृत्व प्रकट करण्याची संधी तेंडुलकरांना मिळाली. ह्या संधीचे आव्हान स्वीकारून महात्मा गांधींचा ' गौरव ग्रंथ ' संपादून तो त्यांनी प्रसिध्द केला. त्या ग्रंथाचे संपादन करीत असताना गांधींच्या निकट सान्निध्यात ते आले हा त्यांचा भावी कार्याच्या दृष्टीने फार मोठा फायदा झाला. 'गौरव ग्रंथा'च्या यशामुळे राष्ट्रपित्याचे विस्तृत चरित्र लिहिण्याची तेंडुलकरांना स्फूर्ती झाली. असे चरित्र लिहिण्याचे आव्हान स्वीकारणे हे सोपे काम नव्हते. त्यांच्या चरित्राचे सर्व धागे जुळविण्यासाठी त्यांना अनेक ठिकाणी जावे लागले, अनेक ग्रंथ चाळावे लागले, चरित्राला उपयुक्त होईल अशी माहिती शोधून काढावी लागली, पत्रव्यवहार, वर्तमान पत्रांचे जुने अंक, सरकारी फायली वगैरे काळजीपूर्वक वाचून आवश्यक ती माहिती गोळा करावी लागली. कित्येक महिने अहोरात्र काम करण्याचा हा उद्योग होता. असे असूनही चरित्र लिहिण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. एकच मुख्य अडचण होती. ती म्हणजे हे चरित्र लिहिण्यासाठी खुद्द महात्मा गांधींची परवानगी मिळविणे. 'गौरव-ग्रंथा'चे संपादक म्हणून महात्माजी तेंडुलकरांना ओळखीत होते. त्यांच्या लेखनकौशल्याबद्दलही महात्मा गांधींना विश्वास होता. असे असूनही आपले चरित्र लिहिण्यासाठी एक अट तेंडुलकरांना त्यांनी घातली. ती म्हणजे ते चरित्र छापायला देण्यापूर्वी आपल्याला ते दाखवायला हवे. कारण त्यांत कोणतीही चुकीची माहिती छापली जाऊ नये. ही अट घालून का होईना महात्माजींनी चरित्र-लेखनास परवानगी दिली याचाच तेंडुलकरांना आनंद झाला. त्यांची ती अट स्वीकारून इ. स. १९४७ साली तेंडुलकरांनी चरित्र लेखनास प्रारंभ केला.

## ' महात्मा ' चरित्र-लेखन

महात्मा गांधींच्या चरित्र-लेखनाचे आव्हान तेंडुलकरांनी स्वीकारले खरे; पण त्या कामाच्या संकल्पनेचे संपूर्ण स्वरूप सुरुवातीला त्यांना आकलन करता

आले नाही. पुस्तकाची ५०० पृष्टे लिहून झाली तरी महात्म्याच्या जन्मापर्यंतही ते मजल मारू शकले नाहीत! याचा अर्थ असा की, महात्मा गांधींच्या जन्मा-पूर्वीची भारताची राजकीय व सामाजिक परिस्थिती काय होती याची कल्पना वाचकांना करून दिल्यास महात्मा गांधींना भारतात आल्यावर कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले याचे स्वरुप स्पष्ट व्हावे. त्याच प्रमाणे महात्मा गांधी इ. स. १९१५ मध्ये साऊथ आफ्रिकेहून भारतात आले. वयाच्या २४ व्या वर्षी म्हणजेच इ. स. १८९३ साली गांधी साऊथ आफ्रिकेत गेले. तेथे ते २० वर्षे कामगारांच्या दु:खाचे विमोचन करण्याच्या कार्यात मग्न होते. त्या कार्याचे महत्त्व तेंडुलकरांनी चरित्राच्या ओघात विशद केलेच आहे. चरित्राचे नाव 'महात्मा' असे तेंडुलकरांनी ठेविलेले होते. ४०० ते ५०० पृष्ठांचा एकेक असे आठ खंड या चरित्रग्रंथाचे झाले आहेत.

दोन वर्षांपेक्षा अधिक काल चरित्र-लेखनाला लागेल हे स्पष्ट होऊ लागले होते. संपूर्ण वेळ या कामाकडे दिला तरच ते दोन वर्षांत पूर्ण होण्याची शक्यता. तेंडुलकरांनी ही दोन वर्षे कशाच्या आधारावर जगायचे हा फार मोठा प्रश्न होता. मधून मधून वर्तमान पत्रांत लेख लिहून त्यातून मिळणाऱ्या मोबदल्यावर आपल्या दैनंदिन गरजा ते भागवीत असत. थोडक्यात म्हणजे त्यांचे पोट त्यांच्या हातांवर अवलंबून होते. महात्मा गांधींच्या वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांनी संपादन केलेला 'गौरव-ग्रंथ' गांधीजींच्या पासून सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या प्रशंसेस पात्र ठरला होता हे खरे. पण त्यांतून तेंडुलकरांना आर्थिक लाभ किती झाला याचा कल्पना नाही. केवळ ध्येयवादाने व राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन त्यांनी ते काम स्वीकारले; पण देशभक्तीचे भांडवल करून पुढे गबर झालेल्या मंडळीप्रमाणे तेंडुलकरांची वृत्ती नसल्यामुळे, त्यांच्या हाती फक्त स्तुति—सुमनेच आली! पण महात्मागांधींच्या चरित्राचे लेखन सतत दोन वर्षे करणे, साधने मिळविण्यासाठी भारतात सर्वदूर प्रवास करणे यासाठी कोणत्याही प्रकारची पैशांची तरतूद न करता तेंडुलकरांनी ते आव्हान स्वीकारले होते. पण त्यांच्या कांही स्नेह्यांनी त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना आर्थिक साहाय्य केले हे जरी

खरे असले तरी त्याला मर्यादा होतीच. जोपर्यंत चरित्र लेखनाचे काम सुरू होते तोंपर्यंत मधून मधून त्यांना आर्थिक साहाय्य यदृच्छया मिळत गेले: पण या प्रचंड कामासाठी जो निधी लागणार होता तो उभा करण्याची कांहीही व्यवस्था न करता तेंडुलकरांनी कामाला सुरुवात केली, हे थोडेसे धाडसच म्हटले पाहिजे. मधून मधून स्नेह्यांनी आर्थिक मदत करणे व निधीतून दर महिन्याला नियमितपणे पैशांचा पुरवठा होणे यात फरक आहे. दोन वेळच्या जेवणाची व चहाची व्यवस्था होणे ही तर किमान गरज. पण शिवाय मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, एशियाटिक ग्रंथालय, सेक्रेटरिएट रेकॉर्ड ऑफिस, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या ठिकाणी जाऊन तेथील चरित्राला आवश्यक असलेली माहिती नकलून घेणे व भारतात सर्वदूर प्रवास करणे यासाठी लागणारा पैसा किती लागला असेल याची कल्पनाच केलेली बरी ! तेंडुलकर आपल्या मित्रांच्या मदतीवर अवलंबून असत. त्यापैकी 'सकाळ'चे संस्थापक व संपादक डॉ. ना. वि. परुळेकर हे प्रमुख होते.

तेंडुलकरांच्या शब्दांतच लिहावयाचे तर 'चरित्र-लेखन कालांत ते अक्षरश: लोकांकडे पैशांची याचना करून जगत असत.' असे सांगितले पाहिजे. पण गांधीजींचे संपूर्ण चरित्र पुरे करण्याची दुर्दम्य जिद्द त्यांच्या ठिकाणी असल्यामुळेच ते हे कष्टाचे व एका दृष्टीने अपमानास्पद असे जीवन जगत होते. चरित्र-लेखनाच्या कामाला तब्बल दोन वर्षांचा काळ लागला व संकल्पित ८ खंडांपैकी ७ खंड पुरे होतात न होतात तोच दि. ३० जानेवारी १९४८ रोजी दिल्लीतील बिर्लाहाऊसच्या पटांगणात सायंकाळची सामूहिक प्रार्थना करीत असताना एका मारेकऱ्याच्या गोळीला महात्मा गांधी बळी पडले ! त्यांचा खून करण्यात आला. पण चरित्राचे बहुसंख्य खंड गांधीजींनी तत्पूर्वी स्वत: वाचून व तपासून दिले होते. व चरित्राचे आठही खंड मुद्रणाला देण्यापूर्वी महात्मा गांधींचे पट्टशिष्य पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वत: वाचून तपासून दिले होते. किंबहुना यामुळेच या आठ खंडातील चरित्र-ग्रंथाला अधिकृत स्वरूप प्राप्त झालेले आहे.

'महात्मा' या नावाने लिहिलेले गांधीजींच्या चरित्राचे आठही खंड मुद्रित स्वरूपात एकदम प्रसिद्ध झाले. या चरित्रातील माहिती अचूक व अधिकृत असावी या बाबतीत तेंडुलकर हे जसे जागरूक होते त्याचप्रमाणे त्या आठही खंडाची छपाई अत्युत्कृष्ट, अचूक व सुंदर छपाईच्या कसोटीला उतरली पाहिजे या बाबतीत त्यांचा फार मोठा कटाक्ष होता. महात्मा गांधींच्या मोटेपणाला न्याय देणारी त्यांच्या चरित्र-ग्रंथाची छपाई व सजावट व्हावी या बाबतीत ते विशेष दक्ष होते. चरित्र ग्रंथातील एकूणएक माहिती व तिचा तपशील त्यांनी जसा चोखंदळपणाने निवडलेला होता, त्याचप्रमाणे तो अधिकृत असावा याची काळजीही त्यांनी फार परिश्रमपूर्वक घेतलेली होती. इतकेच नव्हे तर त्या माहितीची मांडणी, तिचे मुद्रण व पुस्तकांची अन्तर्बाह्य सजावट ही सर्वत्र महात्माजींच्या मनांत भरेल इतकी आकर्षक करण्याचा तेंडुलकरांनी आपल्या परीने प्रयत्न केलेला होता. पण दुर्दैवाने चरित्राचे खंड छापून तयार झालेले पाहण्यास महात्माजी जगले नाहीत याबद्दल त्यांच्या मनाचा मोठाच विरस झाला !

## चरित्र-ग्रंथाचे वैशिष्ट्य

महात्माजींच्या चरित्राचे आठही खंड छापून तयार होतात न होतात तोच त्यांची पहिली आवृत्ती संपून गेली ! आर्थिक दृष्ट्या ही पहिली आवृत्ती तोट्यातच गेली. खुद्द तेंडुलकरांच्या खिशात चरित्र-ग्रंथाच्या विक्रीतून जमा झालेल्या पैशांतून फारशी रक्कम पडली नाही ! पण त्याचे त्यांना मुळीच वैषम्य वाटले नाही. किंबहुना या चरित्रग्रंथातून आपल्याला पैशांचा काही लाभ व्हावा ही त्यांची मुळात इच्छाच नव्हती. ' टाइम्स ऑफ इंडिया ' च्या प्रकाशन विभागाने हे खंड मुद्रणाला व प्रकाशनाला स्वीकारण्यासाठी रु. ५०,००० ची अनामत रक्कम भरली पाहिजे ही अट घातली होती. ही रक्कम उभी करण्यासाठी महात्मागांधींचे १० हितचिंतक व चहाते यांच्याकडून प्रत्येकी रु. ५०००/. प्रमाणे तेंडुलकरांनी ही रक्कम कर्जाऊ घेतली. 'टाइम्स'च्या मुद्रणालयाने या चरित्र-ग्रंथाची छपाई व सजावट दृष्ट लागण्या इतकी आकर्षक

केलेली पाहून तेंडुलकरांना तर अत्यंत समाधान झालेच; पण आजही 'महात्मा'चे हे आठही खंड कित्येक नामवंत व्यक्तींच्या खाजगी ग्रंथ-संभाराची भूषणे होऊन राहिले आहेत !

या चरित्र-ग्रंथाचे दुसरे एक वैशिष्टय असे की, हा चरित्रग्रंथ गांधीजींनी स्वतःच्या हातांनी लिहिलेले लेखन व पुरविलेली माहिती यांच्या आधारावर प्रामुख्याने लिहिलेला आहे. अशा प्रकारच्या चरित्र ग्रंथात विभूति-पूजेला नेहमी ऊत आलेला दिसून येतो. पण तेंडुलकरांनी लिहिलेल्या गांधीजींच्या या चरित्रात ती अभावाने आढळते. चरित्र-नायकाबद्दल उणा अधिक एकही शब्द जसा या चरित्रात आढळत नाही त्याचप्रमाणे, चरित्रलेखकाने या चरित्रात कुठेही उगाच शेरेबाजीही केलेली नाही. वस्तुतः तेंडुलकर या चरित्राबद्दल नेहमी म्हणत असत की, हे चरित्र केवळ गांधीजींचे चरित्र आहे असे नसून महात्माजींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनतेने स्वातंत्र्य प्राप्तीसाठी गेल्या अर्ध शतकात जो लढा दिला त्या लढ्याचा हा इतिहास आहे. या चरित्रग्रंथाचे आठही खंड वाचले तर तेंडुलकरांचे म्हणणे किती सार्थ आहे, याचे प्रत्यंतर यावे.

चरित्रग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या सर्व ४००० प्रती विकल्या गेल्या तेव्हा केंद्र सरकारच्या प्रकाशन विभागाने त्याची दुसरी आवृत्ती छापून प्रसिद्ध करण्याची भाषा तेंडुलकरांशी सुरू केली. तेंडुलकरांनी त्यांच्या मागणीला संमती दिली. मात्र तसे करतांना गांधींच्या जीवनावर तोपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात जी नवीन माहिती मिळाली व महात्मा गांधींचे सहकारी व सचिव महादेवभाई देसाई यांनी लिहिलेल्या व नंतर प्रसिद्ध झालेल्या 'दैनंदिनी'तील माहिती यांची भर योग्य ठिकाणी घालून दुसऱ्या आवृत्तीची तयार केलेली मुद्रणप्रत प्रकाशन—विभागाच्या स्वाधीन केली. पहिल्या आवृत्तीत तेंडुलकरांनी महात्मा गांधींच्या जीवनांतील अनेक प्रसंगाची व त्यांच्या सान्निध्यात आलेल्या अनेक व्यक्तींची निवडक छाया-चित्रे घातली होती. व त्यामुळे त्या आवृत्तीच्या सौंदर्यात व आकर्षणात मोलाची भर पडली होती. पण दुसऱ्या आवृत्तीत त्यांपैकी फारच थोडी चित्रे का घालण्यात आली त्याचे कारण मात्र तेंडुलकरांनी

कधी सांगितले नाही. ही दुसरी आवृत्तीही हां हां म्हणता संपली. तेव्हां प्रकाशन विभागाच्या सांगण्यावरून तेंडुलकरांनी तिसरी आवृत्ती तयार करण्याच्या कामाला सुरवात केली.

## फ्रंटियर गांधींचे चरित्र

'महात्मा' या चरित्रग्रंथाला लाभलेली विलक्षण लोकप्रियता लक्षात घेऊन भारताच्या स्वातंत्र्ययुद्धात हिरिरीने भाग घेतल्यामुळे ज्यांच्या नावाला महत्त्व येऊन जे नामवंत झाले होते अशा काही श्रेष्ठ व ज्येष्ठ पुढाऱ्यांची चरित्रे लिहिण्याच्या अनेक सूचना तेंडुलकरांना करण्यात येऊ लागल्या. पण शांतपणाने त्या सर्व सूचनांना त्यांनी नकार दिला. महात्मा गांधींचे चरित्र त्यांनी आंतरिक ध्येयवादाच्या ओढीने व गांधीजींबद्दल वाटणाऱ्या अतीव आदरबुद्धीमुळे लिहावयास घेतले. त्यातून धंदा करावा हा त्यांचा मुळीच हेतू नव्हता. किंबहुना त्या प्रचंड चरित्र-ग्रंथाची पहिली आवृत्ती संपली तेव्हा त्यांना फार मोठे समाधान झाले. त्या आवृत्तीतून त्यांना काही लाभांश मिळाला नाही याचे त्यांना मुळीच वैषम्य वाटले नाही. कारण एक व्यवसाय म्हणून काही त्यांनी चरित्र लेखनाचे काम स्वीकारलेले नव्हते ! पण पुढे जेव्हां त्यांनी पाख्तून पुढारी खान अब्दुल गफारखान ऊर्फ फ्रंटियर गांधी यांचे चरित्र लिहिण्याचे ठरविले तेव्हा त्यांना आंतून तशी प्रेरणा मिळाली म्हणूनच ते त्यांनी लिहावयास घेतले. आपल्या काही जवळच्या मित्रांजवळ तेंडुलकर बोललेही होते की, खान अब्दुल गफार खान हे एक फार मोठे पुढारी असून, महात्मा गांधींपेक्षाही काही बाबतीत ते मोठे आहेत. अनेकांचे त्यांच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. किंबहुना म्हणूनच आपण त्यांचे चरित्र लिहावे असे आपल्या मनात आहे. महात्मा गांधींपेक्षा कमी महत्त्व असलेल्या माणसाबद्दल अगर त्याच्या सेवेबद्दल लिहिण्यासाठी आपण आपली लेखणी झिजवायची नाही, हे त्यांचे धोरण होते, हे उघड आहे. भारताच्या फाळणीनंतर फ्रंटियर गांधींचा जो छळ झाला व स्वातंत्र्ययुध्दात त्यांच्या बरोबर लढलेल्या त्यांच्या मित्रांनी त्यांची जी दुर्दैवी

हेळसांड केली त्यामुळे तेंडुलकरांच्या सहानुभूतीची तार छेडली गेली ! पुस्तू भाषेतील कागदपत्रांचा अभ्यास करून व आवश्यक त्या माहितीची जमवाजमव करून तेंडुलकरांनी या भारतीय व पाखूतून पुढाऱ्याचे ' Abdul Ghaffar Khan : Faith is a battle ' या नावाने जवळ जवळ ५५० पृष्ठांचे चरित्र आपल्या उतार वयात त्यांनी लिहिले (१९६७). हे त्यांनी लिहिलेले दुसरे व शेवटचे चरित्र होय. हे पुस्तक ' गांधी पीस फाऊंडेशन ' व 'पॉप्युलर प्रकाशन' मुंबई या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित झाले. या चरित्रासंबंधी जे अभिप्राय प्रसिद्ध झाले त्यांची जर गोळाबेरीज केली तर ती पुढीलप्रमाणे होईल.

" The life of Abdul Ghaffar Khan is an inspiring Saga, a triumph of spirit which knows nothing o force, whose conquests are won by the power of invincible gentleness. Mahatma Gandhl deseribed him as a man of God. One of the greatest leaders of Asia, he was a close collage of Gandhi and passionate fighter for freedom. His contribution towards the emancipation of India is immeasurable. Here is a stirring and authentic account of the indomitable spirit of the Pathan and their unique. leader.

In the preparation of this biography, the author of eight valumes of Mahatma,-a work, which in the words of the Times Literary Supplement will never be surpassed as a thesaurus of Gandhi's vast activities-was fortunate in having active Co-operation of Badshah Khan and Jawaharlal Nehru Not easily available elsewhere, the material published here for the first time is the result of three years of intense research. The book presents a vivid account of Abdul Ghaffar Khan's life and work in Pakistan also. The book can truly be described as the ninth volume of Mahatma, embellished with many rare illustrations'.

आपल्या आयुष्यात तेंडुलकरांना अनेक कठीण प्रसंगांना व कधी कधी अपघातांनाही तोंड द्यावे लागले. मोठ्या धैर्याने त्यांनी ते दिलेही. तसे अनेक

भाग्याचे व दुर्भाग्याचे चढउतारही त्यांनी आयुष्यभर पाहिले. पण ते नाउमेद कधी झाले नाहीत. अस्थिर चित्तवृत्तीमुळे संसार करण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत हे खरे. ते ब्रह्मचारीच राहिले. जीवनाच्या सुरूवातीला त्यांची काळजी त्यांची वहिनी सौ. सुलोचना तेंडुलकर यांनी घेतली होती आणि त्यांनी महात्मा गांधींच्या चरित्र-लेखनास सुरूवात केली तेव्हा त्यांच्या मदतनीस कु. अनु बंडोपाध्याय यांनी त्यांच्या स्वास्थ्याकडे लक्ष पुरविले. चरित्र लेखनाच्या त्यांच्या उद्योगात मुद्रण-प्रती तयार करणे व छापखान्यांकडून आलेली मुद्रितेही तपासणे या कामात कु. अनु बंडोपाध्याय यांची त्यांना बरीच मदत झाली.

## तेंडुलकराचा 'एकांत' बंगला

तेंडुलकर मुंबईला आले तेव्हा ते ४०७ काळबादेवी रोड येथे एका खोलीत त्यांचे वडील राहत होते त्याच ठिकाणी राहात होते. पण पुढे श्री. वेलिंगकर यांच्या मालकीची ती चाळ फार जुनी असल्यामुळे त्या इमारतीचा काही भाग जेव्हा कोसळला तेव्हांच ती खोली त्यांना सोडणे भाग पडले. नाहींतर त्याच खोलीत त्यांनी १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात अनेक भूमिगतांना आश्रय दिला होता. पण आता चाळच पडत आलेली असताना त्या खोलीत राहणे धोकादायक होते. हे त्यावेळचे मुंबईचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांच्या कानावर गेले. त्यांनी तेंडुलकरांना बोलावून घेतले व वाळकेश्वरला बाणगंगेजवळ त्यांना एक लहानसा जमिनीचा तुकडा देऊ केला व त्यांची राहण्याची तात्पुरती व्यवस्थाही केली. पंडित नेहरूंनी त्याना आर्थिक मदत दिल्यामुळे त्या जागेवर त्यांनी एक छोटासा बंगला बांधला. त्या बंगल्याचे त्यांनी नाव ठेवले 'एकांत'. या ठिकाणी साधे, गवाळ्यासारखे ते राहू लागले. ते शेवटपर्यंत तेथेच होते. त्यांची मदतनीस कु. अनु बंडोपाध्याय हीही तेथेच त्यांच्याबरोबर राहात असे. तेंडुलकरांची 'एकांत' मधील राहणी जर कुणी पाहिली असती तर हा गृहस्थ इग्लंड, जर्मनी, रशिया येथे काही वर्षे राहून आलेला आहे असे कुणालाही वाटले नसते. त्यांना एकांत नेहमी प्रिय असे. म्हणूनच त्यांनी बंगल्याचे नाव 'एकांत' ठेविले असावे. हा बंगला बाणगंगे-

जवळ असल्यामुळे, आपल्या निधनानंतर आपला पार्थिव देह दहनभूमीवर नेण्यासाठी आपल्या मित्रांना फार लांब जायला नको असे ते विनोदाने म्हणत.

## तेंडुलकरांचे संगीत–कला प्रेम

तेंडुलकर हे 'स्कॉलर' होते. ते गणिताचे विद्यार्थी असल्यामुळे गणिता-प्रमाणेच त्यांचे लेखनही आटोपशीर, तर्कनिष्ठ, फापटपसारा नसलेले अगदी नेमके असे होते. त्यांना पुस्तके, दुर्मीळ ग्रंथ, संगीताच्या रेकार्डस, वगैरे विकत घेण्याचा छंद होता. भारतीय कला, संस्कृतीया विषयावर एक ग्रंथ ते लिहिणार होते. त्यासाठी भारतभर केलेल्या भ्रमणात भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या अनेक वस्तू व चिजा विकत घेऊन त्यांचा संग्रह त्यांनी केला होता. अनेक विषयांवरील पुस्तके त्यांनी विकत घेतलेली होती. त्यांचा हा संग्रह फार मोठा होता. त्यांचा हा संग्रह तेंडुलकरांच्या निधनानंतर त्यांच्या विश्वस्तांनी न्यू दिल्ली येथील 'त्रिमूर्ती ग्रंथालया'ला भेट म्हणून दिला. ही सर्व पुस्तके 'तेंडुलकर कॉर्नर' म्हणून त्या ठिकाणी निराळी ठेवण्यात आली आहेत.

तेंडुलकरांना संगीताची जशी विलक्षण आवड होती त्याचप्रमाणे बाग-बगीचा करण्याची आवड होती. आपल्या 'एकांत' बंगल्याच्या सभोवती जी थोडी मोकळी जागा होती त्याठिकाणी ते अनेक प्रकारची झाडे, फुलझाडे, फळझाडे लावीत व दररोज सकाळी त्यांना पाणी घालणे, त्यांच्या बुडाशी खत घालणे, त्यांच्यावर कृमिनाशक औषधाचे फवारे मारणे ही माळ्याची कामे ते स्वतः करीत. एक खाकी अर्धी तुमान व गंजीफ्रॉक हा त्यांचा बागेतील पोशाख असे. त्यांच्या संग्रही अनेक प्रख्यात गवयांच्या गाण्यांच्या रेकॉर्डस होत्या–हिन्दुस्थानी व पाश्चात्यांच्या गाण्याच्याही. या सर्व वस्तू मुंबईच्या Academic Cultural Centre या संस्थेला त्यांच्या निधना-नंतर भेट म्हणून देण्यात आल्या.

इ. स. १९७० साली श्री. आर. के. नेहरू हे आसामचे राज्यपाल असताना त्यांच्या निमंत्रणावरून तेंडुलकर आसामला गेले होते. तेथील काही

प्रश्नांचा व विशेष परिस्थितीचा अभ्यास करून त्यासंबंधीची पुस्तकं लिहिणे हा त्यांच्या जाण्याचा हेतू होता. पण तिकडे आजारी पडूनच ते परत मुंबईला परतले. वाळकेश्वर येथे तीन बत्तीजवळ पूर्वी मोटार सायकलचा धक्का लागून त्यांच्या पाठीच्या माणक्याला जबर दुखापत झाली होती. तिच्यावर वेळीच उपचार झाल्यामुळे ती संपूर्णपणे बरी झाली आहे असे त्यांना वाटले. पण आसामचा प्रदेश डोंगराळ असल्यामुळे तेथील मुक्कामात त्यांना बरीच चढउतार करावी लागली. त्यामुळे त्यांचे पाठीचे दुखणे सुरू झाले व ते बळावले. ते आजारी होऊनच परतले. आसामची सफर त्यांना तशी महागच पडली. त्यांची स्मृती नष्ट झाली. कोणाला ओळखणे त्यांना कठीण पडू लागले. काही औषधोपचारानंतर त्यांना बरे वाटू लागले होते. त्यांचे शेजारी व स्नेही 'टाइम्स ऑफ इंडियाचे' श्री. श्यामलाल यांनी त्यांना जे. जे. हॉस्पिटलमध्ये शुक्रवार दि. ११ जून १९७१ रोजी नेऊन त्यांची सर्व तपासणी करवून घेतली. त्या वैद्यकीय तपासणीत विशेष काही दोष आढळला नाही. प्रकृती त्या वयात जशी असावी तशीच ती चांगली (नॉर्मल) असल्याचा दाखला त्यांना देण्यात आला. शुक्रवारी रात्री नेहमीप्रमाणे जेवण घेऊन ते झोपी गेले. पण शनिवारी सकाळीच बहुधा मेंदुतील रक्तस्त्राव झाल्यामुळे ते बेशुध्द झाले असावे. काय झाले हे कोणालाच कळले नाही. सकाळीच उठायचे ते काही उठले नाहीत. वैद्यकीय उपचारांचा काही उपयोग झाला नाही. ते बेशुध्द झाले ते कांही पुन्हा शुध्दीवर येऊ शकले नाहीत. त्यांना जे. जे. हॉस्पिटलमध्ये पुन्हा हलवण्यात आले होते. पण तेथेच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले ! त्यांच्या पार्थिव देहावर बाणगंगा दहनभूमीत अग्निसंस्कार करण्यात आले. त्यावेळी त्यांचे स्नेही न्यायमूर्ती पालेकर, श्री. श्यामलाल श्री. गोविंदराव तळवलकर वगैरे त्यावेळी उपस्थित होते. एका प्रभावी चरित्रकाराचा, छायाचित्रकाराचा आणि पत्रकाराचा अशा रीतीने दि. १२ जून १९७१ रोजी दुर्दैवी शेवट झाला !

तेंडुलकरांनी महात्मा गांधींचे आठखंडी चरित्र लिहिले, खान अब्दुल गफार खान यांचे साडेपांचशे पानाचे चरित्र लिहून पठाणांच्या प्रश्नाकडे जगाचे

लक्ष वेधले. Gandhi in Champaran हे पुस्तक लिहून महात्मा गांधींच्या चंपारण्यातील कार्याचा अधिकृत परिचयही करून दिला. पण स्वतःच्या चरित्राबद्दल व जीवनाबद्दल या चरित्रकाराने एकही शब्द लिहून ठेवू नये याचे आश्चर्य वाटते ! तेंडुलकरांनी जर स्वतःचे आत्मचरित्र लिहिले असते तर ते अतिशय रोमांचकारी व भावी पिढ्यांना उद्बोधकही झाले असते. त्याच्या अभावी न्या.मू. पालेकर वगैरेंनी त्यांच्याबद्दल जे थोडे लिहिले आहे, त्याच्या आधारानेच त्यांच्या व्यक्तित्वाची जी माहिती मिळते त्या माहितीवर समाधान मानावे लागते. त्यांचा स्वभाव थोडासा विक्षिप्तच होता. ते लोकांत फारसे मिसळत नसत व सभा–समारंभात कसलाही भाग घेत नसत, असे दिसते. पण ते अगदीच भावनाशून्य नव्हते. १९४२ साली त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर अग्निसंस्कार केल्यावर दहनभूमीवरून तडक ते प्रा. न. र. फाटक यांच्या घरी गेले व मी आता निराधार झालो ! असे उद्गार भडभडून आल्यामुळे त्यांनी काढले ! 'आकाशवाणी ' वरील एक निवृत्त केंद्राधिकारी श्री. मूर्ती एकदा दिल्लीला जायला निघाले. तेव्हां तेंडुलकरांनी आपल्या बागेतील एक पोपया खास इंदिरा गांधींना देण्यासाठी त्यांच्याजवळ दिला ! या गोष्टी जर खऱ्या असतील तर तेंडुलकर भावनाशून्य होते असे म्हणून कसे चालेल ? जेव्हा मनुष्य स्वतःबद्दल एक शब्दही लिहून ठेवीत नाही तेव्हां त्याच्याबद्दल लोक अनेक खऱ्या खोट्या गोष्टी रंगवून सांगत सुटतात, त्यांतील खऱ्या गोष्टी किती व भाकडकथा किती हे कशाच्या आधारावर पारखायचे ?

एक गोष्ट निश्चित. त्यांची देशभक्ती ज्वलंत होती. त्यांनी स्वातंत्र्य युध्दात उडी घेतली, कारावासातील हाल अपेष्टा सहन केल्या, अनेकांची शुश्रूषा केली, त्यांना मदत केली, आपल्या खोलीत राजकारणात गुंतलेल्या भूमिगतांना आश्रय दिला. गांधीजींचे एक संक्षिप्त चरित्र लिहिण्याची त्यांची इच्छा त्यांच्या आकस्मिक निधनामुळे अपुरीच राहिली ! त्यांच्या अंतःकरणातील देशभक्तीच्या भावनेनेच महात्मा गांधी व फ्रंटियर गांधी यांची चरित्रे लिहावयास ते प्रवृत्त झाले. चरित्र-लेखन हा त्यांचा देशभक्तीचाच एक प्रकार होय असे म्हणता येईल !

ही चरित्रे पाहिली म्हणजे तेंडुलकराच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचे त्यांच्या चिकाटीचे, विविध ठिकाणाहून अधिकृत माहिती गोळा करून त्या माहितीचा उपयोग करण्यांतील त्यांच्या परिश्रमांचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. ही चरित्रेंच म्हणजे त्यांचे खरे स्मारक होय !

मुंबई मराठी पत्रकार संघाने लोणावळे येथे ' दि. गो. तेंडुलकर स्मृति-मंदिर' या दुमजली इमारतीचे उद्‌घाटन दि. ११ एप्रिल १९७६ रोजी त्या वेळचे परराष्ट्र मंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते करून तेंडुलकरांची स्मृती कायमची जागृत ठेवण्याची व्यवस्था केली आहे. येथे काही पत्रकार-पाहुण्यांच्या तात्पुरत्या राहण्याची व्यवस्था केली आहेच; शिवाय प्रसंगशः पत्राकारांच्या सहली, व त्यांचे काही समारंभही त्या ठिणाणी होत असतात, त्यामुळे पत्राकारांना तेंडुलकरांची स्मृती सतत होत राहील हा या स्मृति-मंदिराचा एक फार मोठा विशेष होय.

डी. जी. तेंडुलकर यांचे पासपोर्ट फोटो

१९२९, १९३७, १९६३ ते ६९





३१ जुलै १९२९




१८ जानेवारी १९३७




१८ नोव्हेंबर १९६३ ते ६९



कै. दिनानाथ गोपाळ तेंडुलकर स्मारक मंदिर, लोणावळा

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

# उपसंहार

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

श्री. डी. जी. तेंडुलकरांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे व Man of god म्हणून गांधीजींनी ज्यांना म्हटले त्या सरहद्द गांधी अब्दुल गफार खान यांचे अशी दोन प्रचंड चरित्रे लिहिली हे खरें. ती चरित्रे सबंध जगात गाजली हेही खरे. पण त्यांच्या या कार्याची फलश्रुती काय ? डी. जींनी स्वतःच्या कुटुंबियांसाठी काय केले ? ज्या जातीत त्यांचा जन्म झाला त्या कुडाळदेशकर गौड ब्राह्मण समाजासाठी त्यांनी काय केले ? जिने डी. जीं.च्या शालेय जीवनापासून त्यांना वाढविले त्या आपल्या वहिनींसाठी त्यांनी काय केले ? असे हजार प्रश्न विचारणारी अनेक मंडळी भेटतात. त्यांना काय उत्तर द्यायचे ? एक मन व एक हात काम करीत असतो. पण त्याच्या त्या कार्याचा जाब विचारणाऱ्या अशा हजार जिव्हा असतात ! 'त्यांना हेच पुसा की '-या चालीवर व धर्तीवर अनेक प्रतिप्रश्न विचारुन निरुत्तर करता येईल हे खरे असले तरी तसे करण्याचा येथे विचार नाही. पण त्या दृष्टीने काही विवेचन करणे मात्र इष्ट व्हावे.

श्री. तेंडुलकर हे गणितात रँग्लर व्हावे या हेतूने विलायतला गेले. त्यासाठी अनंत शिवाजी देसाई व अनेक हितकर्ते यांनी त्यांना आर्थिक साहाय्य केले. केंब्रिज येथे एक वर्ष अभ्यास केल्यावर त्यांना महात्मा गांधीनी भारतात सत्याग्रह

चळवळीसाठी जी हाक दिली ती ऐकू आली व आपला अभ्यास अर्धवट सोडून ते भारतात परत आले व त्यांनी त्या चळवळीत हिरिरीने भाग घेतला! शिक्षणासाठी लोकांची आर्थिक मदत घेऊन जाणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्याने असे करणे निःसंशय आक्षेपार्ह आहे यांत शंका नाही. पण तेंडुलकर हे मन हे सर्वसामान्य माणसांच्या मनापेक्षा निराळे होते. ते बंडखोर मन होते. स्वाभाविकच प्रस्थापिताविरुद्ध वागणे हा त्या मनाचा स्वभावधर्म होता. सर्वसामान्य मनुष्य, संधी मिळालेली आहे तिचा उपयोग करून घेणे हे आपले कर्तव्य आहे, असे समजून वागला असता. त्याने राजकारणात पडण्याचा उपद्व्याप केला नसता. तो सरळ रँग्लर होऊन भारतात परत आला असता. व कोणत्या तरी विद्यापीठात गणित विषयाचा प्राध्यापक झाला असता. पण हे नियम तेंडुलकरांना लावून चालणार नाहीत. महात्मा गांधीवर त्यांची विलक्षण भक्ती, त्यांनी देशाच्या सेवेसाठी हाक दिल्यावर त्यांनी क्षणाचाही विचार अगर विलंब न करता ते भारतात यायला निघाले. वास्तविक त्यावेळच्या बी. ए. च्या प्रथम वर्गात आलेल्या बहुतेक विद्यार्थ्यांची इच्छा आय्. सी. एस. ला जाण्याची असे. ती परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास मग इतर परीक्षांना ते बसत. किमानपक्षी बॅरिस्टर होऊन परत येत. पण तेंडुलकरांची वृत्ती राष्ट्रीय होती. त्यामुळे ते आय्. सी. एस.ला न जाता रँग्लर होण्याच्या उद्दिष्टाने केंब्रिजला गेले, हे लक्षात ठेविले पाहिजे. याचा अर्थ आय्. सी. एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन सुखासीन सरकारी नोकरी पत्करणे हें त्यांचे मुळी ध्येयच नव्हते. ते जर्मनीला गेले, तेथे त्यांनी गणितात 'ट्रायपॉस' घेतला, सिने छायाचित्रणाची कला रशियात शिकले पण भरपूर फायद्याच्या त्या क्षेत्रात न शिरता जिथे ध्येयवाद भरपूर पण पैसे कमी त्या लेखनक्षेत्रात शिरले! तेंडुलकर संसारात अगर स्वतःच्या नातलगांच्या लोभात गुंतले असते तर निर्वेधपणाने त्यांनी चरित्र–लेखनाचे जे प्रचंड कार्य केले ते त्यांना करता आले नसते. देशभक्तीपलीकडे त्यांना आपली मंडळी, आपला समाज, आपली जात दिसली नाही! तसा संकुचित विचार त्यांनी केला असता तर त्यांच्या हातून जे कार्य झाले ते झाले नसते. ते तसे माणूसघाणे नव्हते. त्यांना एकान्त प्रिय होता हे खरे. पण न. र. फाटक, मेहेरअल्ली, पंडित जवाहरलाल नेहरू, रंगराव दिवाकर, न्या. मू. पालेकर, श्यामलाल वगैरे निवडक

मंडळींशी ते समरस होत. व्याख्याने देणे, सभा समारंभात मिरविणे, वायफळ गप्पांत वेळ घालविणे याचा त्यांना मनापासून तिटकारा होता. त्यामुळे त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात गैरसमज होता. किंबहुना त्यामुळे त्यांच्या कामात व्यत्यय न येता ते अप्रतिहत काम करीत राहात. उगीच त्यांच्याकडे जाऊन कोणी त्यांचा वेळ घेत नसत. स्वतःच्या बागेत काम करीत राहाणे व आवडत्या गवयांच्या गाण्यांच्या रेकॉर्डस ऐकत बसणे हाच त्यांना विरंगुळा वाटे, एखादा मनुष्य दूर राहून आपल्या कामात व्यग्र असला की आपला समाज त्याला ‘समाजापासून फटकून वागणारा’ हे लेबल सोयीस्करपणे चिकटवून देतो! पण वस्तुस्थिती तशी नसते. माणूस निघून जातो; पण मागे शिल्लक राहते ते त्याचे लेखन–त्याचे वाङ्मय. डी. जी. काळाच्या पडद्याआड गेले आहेत! आज त्यांनी लिहिलेले महात्मा गांधींच्या चरित्राचे आठ खंड व फ्रंटियर गांधींच्या चरित्राचा ग्रंथ वाचीत असता वाचक लेखकाच्या परिश्रमांचे, लेखनशैलीचे, चरित्रविषय झालेल्या थोर माणसांच्या कर्तृत्वाचे व त्यांच्या विचारांचे कौतुक करीत राहतो व त्याचा वेळ उदात्त अशा वातावरणात केव्हां निघून जातो हे कळत सुद्धां नाही. डी. जी. तेंडुलकरांनी मानवजातीलाही ही केवढी मोठी देणगी देऊन ठेविली आहे बरे?

० ० ०

# आमची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| **प्राचीन मराठी संतकवी** (खंड २ व ३) | ले. ज. र. आजगांवकर संपादन गुं. फ. आजगांवकर | पृष्ठसंख्या १००० | किं. ४० रु. |
| **प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी** (ज. र. आजगांवकर यांचे आत्मचरित्र) | सं: गुं. फ. आजगांवकर | ३०० | किं. १२ रु. |
| **कोकण रेल्वेकर्ते अ. ब. वालावलकर** (लेख, आत्मचरित्र, कुडाळी भगवतगीता) | ,, | ३०० | किं. १० रु. |
| **कुडाळदेशकर (इतिहास आणि व्यक्ती)** भाग १, २, ३ | ,, | ३०० | किं. ८ रु. |
| **वालावल दर्शन** | ,, | १०० | किं २ रु |
| **आजगांव दर्शन** | ,, | १०० | किं. ३ रु. |
| **श्री वेतोबा दर्शन** | ,, | | किं. २ रु. |
| **वसंत देसाई** | ,, | | किं. २ रु. |
| **अनंत शिवाजी** (मराठी चरित्र) | ले. दि. ग. नाईक | १०० | किं. ६ रु. |
| **सेनापति भोसले** (इंग्रजी चरित्र) | ,, | १०० | किं. ३ रु. |
| **गुं. फ. आजगांवकर** (परिचय ग्रंथ) | ,, | | किं. ६ रु. |
| **सेनापति भोसले** (मराठी चरित्र) | ले. गुं. फ. आजगांवकर | | किं. १ रु. |
| **माझी वाटचाल** (आत्मचरित्र) | डॉ. नाईक | १०८ | किं. १५ रु. |
| **क्रांतिपराग** (कविता संग्रह) | गुंफराज | | |

पत्ता :– फोन : ३८ ४१ ७८

**गुं. फ. अजगांवकर,** कार्यवाह

**कोकण मराठी डायलेक्ट्स् रिसर्च इन्स्टिटयूट**

२५, के. बी. निवास, मुंबई–४०० ००४.